दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे  सपादक बडूभाऊ इगोले

वाशीम ■ मंगळवार दिनांक 06 मे 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक : 342 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL03935


## रस्त्याच्या कामाच्या आधीच ठेकेदाराला बिल अदा

### मुरबाडच्या जि.प. बांधकाम विभागाचा महाप्रताप

**मुरबाड**

मुरबाडमधील एका आदीवासी वाडीत प्रत्यक्षात कामाचा पत्ता नसताना मुरबाडच्या जिल्हा परिषद बांधकाम विभागाने चक्क ठेकेदाराला रस्त्याच्या कामाचे पूर्ण बिल अदा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबत ग्रामस्थांकडून ठाणे जिल्हा परिषदच्या बांधकाम विभागाला तक्रार दाखल होताच धाबे दणाणलेल्या अधिकारी आणि ठेकेदाराने कामाला सुरुवात केली आहे.

यासंदर्भात ठाणे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला सादर केलेल्या तक्रारी वरून, मुरबाड तालुक्यातील पद्याचीवाडी येथे मुरबाडच्या जिल्हा परिषद बांधकाम उपविभागामार्फत ३०/५४, १९९६ या लेखाशीर्षकाखाली जोड रस्ता सुधारणा करणे अशा संदर्भाचे १० लाख रुपये वित्तीय तरतूद असलेले काम मंजूर आहे. परंतु प्रत्यक्षात या कामाला सुरुवात नसतानाही मे. प्रमोद जनार्दन विशे व शाखा अभियंता कांतीलाल सासे, उपअभियंता संजय कोरडे यांनी हे काम ३१ मार्च २०२५ रोजी पूर्ण झाल्याचे दाखवून मोजमाप पुस्तिका (एम.बी.), बील व काम पूर्ण झाल्याचा दाखला वरिष्ठ कार्यालयात सादर करून पूर्ण बील लाटण्याच्या प्रक्रियेला गुप्तपणे सुरुवात केली. परंतु संबंधित ठेकेदाराने प्रत्यक्षात २२ एप्रिल २०२५ रोजी रस्त्याची खोदाई करून कामाला सुरुवात केल्याचे तक्रारीमध्ये नमूद आहे. याबाबत आपले बिंग फुटत असल्याची माहिती मिळताच संबंधित ठेकेदाराने रातोरात लवाजमा उभारून रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. दरम्यान प्रत्यक्षात कामाला सुरुवात नसतानाही एम. बी. व बील कशाच्या आधारावर तयार करण्यात आले? असा सवाल तक्रारदार यांनी केला आहे.

याबाबत संबंधित शाखा अभियंता कांतीलाल सासे यांना संपर्क केला असता त्यांनी कॉल उचलण्याचे टाळल्याने अधिक माहिती मिळू शकली नाही. तर उपअभियंता कोरडे यांना विचारले असता काम आजच पूर्ण करण्यात येणार असल्याचे सांगून त्यांनी अधिक बोलण्यास टाळले.

> या प्रकाराबाबत मला काहीही कल्पना नाही. उपमुख्यमंत्री यांचा आज मुरबाड दौरा असल्याने मी मुरबाडमध्येच आहे. मी माहिती घेतो आणि यावर नक्कीच कारवाई केली जाईल.
> - **रोहन घुगे**, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. ठाणे



## जळगाव जिल्हा कार्यालयीन सुधारणांमध्ये राज्यात तिसरा

### १०० दिवसांत उल्लेखनीय कामगिरी

**जळगाव :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेचा निकाल नुकताच घोषित झाला असून जिल्हाधिकारी डॉ. आयुष प्रसाद यांच्या नेतृत्वाखाली जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने राबवलेल्या १०० दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेत ८०.८६ गुण मिळवत राज्यस्तरावर तृतीय क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी नवशक्तिशी बोलताना या यशाचे श्रेय जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी, कर्मचारी यांच्या कार्याला दिले.

नागरिकाभिमुख सेवा, कार्यालयीन कार्यपद्धती सुधारणा आणि डिजिटल गव्हर्नन्स यावर भर देत जिल्ह्यात प्रशासनात हे सकारात्मक परिवर्तन घडवण्यात आले. लोकाभिमुख प्रशासन, पारदर्शक कामकाज, कागदमुक्त कार्यालय ई – ऑफिस प्रणाली सह विविध उपक्रमात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय हे



आघाडीवर राहीले आहे. या बाबत बोलताना अतिरिक्त जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे म्हणाले की, १०० दिवसांचा कार्यक्रम राबवताना प्रशासनाने कोणताही अतिरिक्त जादा खर्च केला नाही ही महत्वाची बाब आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या पुढाकारातून 'जळगाव संवाद' या ऑडिओ-व्हिज्युअल पद्धतीच्या तक्रार निवारण यंत्रणेमुळे नागरिक थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधू लागले आहेत हे आमचे मोठे यश आहे. तसेच 'शेतसुलभ योजना' अंतर्गत तुकडा नोंदींचे प्रकरण सोडवून शेतकऱ्यांना थेट मोठ्या प्रमाणावर लाभ देण्यात आला. तर 'जिवंत' मोहिमेमुळे मृत व्यक्तींची नावे विविध शासकीय योजनांच्या यादीतून वगळण्यात यश आले.

## पुरंदर विमानतळ होणे गरजेचे

### चंद्रकांत बावनकुळे यांचे प्रतिपादन

**पुणे :** पुरंदर विमानतळासाठी जागा देण्यास शेतकऱ्यांनी नकार दर्शविला आहे. मात्र देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी पुरंदर विमानतळ होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी विमानतळाला जागा न देण्याची भूमिका बदलावी, असे आवाहन महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. तसेच शेतकऱ्यांनी सात दिवसांत ग्रामसभा घेऊन भूसंपादनासाठीचे पर्याय द्यावे, त्यावर शासन सकारात्मकपणे विचार करून मोबदल्याचे पॅकेज जाहीर करेल, असे आश्वासन बावनकुळे यांनी शेतकऱ्यांना दिले.

पुरंदरमध्ये विमानतळासाठी मोजणीवेळी शेतकऱ्यांवर लाठीचार्ज झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर बाधित सात गावांतील शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी महसुलमंत्री बावनकुळे यांनी संवाद साधला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये बावनकुळे यांनी ही माहिती दिली. यावेळी आमदार विजय शिवतारे, शरद सोनवणे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी उपस्थित होते.

#### सर्वेक्षण थांबविण्याचे आदेश

सद्यस्थितीत विमानतळासाठीचे सर्वेक्षण थांबविण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. शेतकऱ्यांच्या मुळावर उठून सर्वेक्षण करणार नसल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.



यावेळी महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, पुरंदर येथे विमानतळास केंद्र व राज्य शासनाने मान्यता दिली आहे. तसेच त्यास विविध संस्थांची तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. विमानतळामुळे संपूर्ण राज्याचे चित्र बदलणार आहे. कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. शेतमाल निर्यातीस चालना मिळणार आहे. त्यामुळे विमानतळाची भूमिका शासन बदलणार नाही. शेतकऱ्यांनी मोबदला देण्याबाबतचे पर्याय जिल्हा प्रशासनाकडे द्यावे. ग्रामस्थांकडून पर्याय आल्यानंतर शासन पुन्हा शेतकऱ्यांबरोबर समोरासमोर चर्चा करण्यास तयार आहे. त्यावेळी मोबदला देण्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेऊ, मात्र विमानतळासाठी जमिन देणार नाही, ही भूमिका स्विकारू नये, असे आवाहन शेतकऱ्यांना केले आहे.

शेतकऱ्यांनी विकासाचा मार्ग उघडावा, थांबलेला प्रकल्प पुढे न्यावा. शेतकरी यांच्या चेहऱ्यावर हसू राहिल अशा पध्दतीने पॅकेज जाहीर करू, असेही बावनकुळे यांनी यावेळी स्पष्ट केले.

बावनकुळे म्हणाले की, मोजणीला विरोध दर्शवित काही नागरिकांनी अधिकाऱ्यांना मारहाण केली आहे. याबाबतचे व्हिडीओ उपलब्ध आहेत.

## महाबळेश्वर वेण्णा लेकवरील ड्रोन शोचे उद्घाटन

**कराड :** महाबळेश्वर येथील महापर्यटन उत्सवा ंतर्गत वेण्णा लेक येथे आयोजित नेत्रदीपक ड्रोन शोचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्रात पर्यटनासाठी खूप मोठा वाव आहे. जगभरातील तसेच देशातील पर्यटक आकर्षित करून महाराष्ट्र राज्य पर्यटनाच्या बाबतीत देशात प्रथम क्रमांकावर राहील यासाठी प्रयत्न करणारा असल्याचे फडणवीस यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री तथा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील, आमदार अतुल भोसले उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महापर्यटन उत्सव महाबळेश्वरचे अत्यंत देखणे व सुंदर पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाला महाराष्ट्रातील पर्यटकांनी चांगला प्रतिसाद दिला.

## बारावीच्या परीक्षेत मुलींची बाजी

### नांदेडचा निकाल ९२.६४ टक्के

**नांदेड :** नांदेड जिल्ह्याचा इयत्ता बारावीचा निकाल ९२.६४ टक्के लागला आहे. यात मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८५.२२ टक्के, तर मुलींचे प्रमाण ९२.६४ टक्के एवढे आहे. निकालात मुलींनी बाजी मारण्याची परंपरा यंदाही कायम आहे. लातूर विभागात नांदेड जिल्हा दुसऱ्या स्थानावर आहे.

यावर्षी बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२५ या कालावधीमध्ये पार पडली. या निकालाकडे विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष लागले होते. सोमवारी दुपारी एकनंतर ऑनलाइन निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा मंडळाच्या साइटला भेट दिल्या. लातूर विभागातील नांदेड जिल्ह्यात यावर्षी बारावी परीक्षेसाठी ४२ हजार ३११ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४१ हजार ७४३ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती.

#### कला शाखेचा निकाल सर्वात कमी

विज्ञान शाखा ९७.४५ टक्के, वाणिज्य शाखा ९०.७८ टक्के, तर कला शाखा ८१.६० टक्के इतका निकाल लागला आहे. यात सर्वात कमी कला शाखेचा निकाल लागला आहे. तसेच अर्धापुर ९७ टक्के, बिलोली, धर्माबाद, लोहा, मुखेड, मुदखेड, नायगाव, उमरी तालुक्यांच्या निकालाची टक्केवारी ही ९० च्या पुढे आहे.

#### छत्रपती संभाजीनगरचा बारावीचा निकाल ९२.२४ टक्के

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल सोमवारी दुपारी १ वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात आला. छत्रपती संभाजीनगरचा निकाल ९२.२४ टक्के लागला. राज्याचा बारावीचा निकाल ९१.८८ टक्के लागला. नेहमीप्रमाणे यंदाही कोकणचे बाजी मारली.

## राजर्षी शाहूंची ब्रेल चरित्रकथा

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोल्हापूरमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची ब्रेल लिपीतून चरित्रकथा प्रकाशित करण्यात आली आहे. द ृष्टीहीन व्यक्तींकरिता ही अशी पहिलीच चरित्रकथा असून, ती विक्रम रेपे यांची संकल्पना आहे. ते छ. शाहू महाराजांच्या जीवनावर संशोधन करणारे अभ्यासक आहेत. या चरित्रकथेचे ब्रेल लिपीत रूपांतर रायगडचे स्वागत थोरात यांनी केले आहे. मजकुराची निवड व पडताळणी ही अभिलेख अधिकारी गणेशकुमार खोदके यांनी केली आहे. ही ब्रेल पुस्तक शिवाजी विद्यापीठामध्ये खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते अर्पण करण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. हे पुस्तक अंध विद्यालये व संस्थांमध्ये विनामूल्य वितरित करण्यात येणार आहे. या ब्रेनचरित्रकथेचा दृष्टीहीन बांधवांना फायदा होणार आहे. त्यांना हे साहित्य वाचायला मिळणार आहे. त्यामुळे अनेक दृष्टीहीन लोकांनी याचे कौतुक केले आहे.



## डहाणूतील 'त्या' गावात नवीन ४० वीज मीटर

### दोन नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणार

**पालघर :** गेले तीन महिने वीज कनेक्शन कट झाल्याने अंधारात गेलेल्या जामशेत, गोरवाडी, कामडीपाडा येथील ग्रामस्थांच्या मागण्या लवकरच पूर्ण होणार आहेत. गावात नवीन ४० वीज मीटर बसवण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले असून, दोन नवीन ट्रान्सफॉर्मर बसवले जाणार आहेत.

डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले यांच्याकडे २ मे २०२५ रोजी या संदर्भात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर केवळ तीन दिवसांतच त्यांनी या प्रश्नावर तातडीने लक्ष घातले. सोमवारी एमएसईबीचे अधिकारी गणेश दंडगवार यांच्यासह आमदार निकोले यांनी स्वतः गावात भेट दिली. या वेळी ग्रामस्थांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि तत्काळ उपाययोजना जाहीर करण्यात आल्या. गावात नवीन ४० वीज मीटर बसवण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले असून, दोन नवीन ट्रान्सफॉर्मर बसवले जातील.

यावेळी डहाणू तालुका सेक्रेटरी कॉ. रडका कलंगडा, महाराष्ट्र राज्य किसान सभेचे कार्याध्यक्ष व ठाणे-पालघर जिल्हाध्यक्ष कॉ. चंद्रकांत घोरखाना, जनवादी महिला संघटनेच्या सेक्रेटरी लहानी दौडा, सरपंच कॉ. विकास दौडा, एमएसईबीचे अधिकारी आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतीविषयीची विचारधारा बदलविण्यात 'फाली'ची मोठी भूमिका

### अनिल जैन यांचे प्रतिपादन

**जळगाव :** सध्याच्या शैक्षणिक पद्धतीमध्ये कृषी विषयक माहिती पाहिजे तितक्या प्रमाणात नाही. त्यामुळे फाली सारख्या कृषी विषयक प्रात्यक्षिकांसह नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना देणाऱ्या उपक्रमाची आज भारताला आवश्यकता आहे. गेल्या अकरा वर्षांपासून फ्युचर ॲग्रीकल्चर लीडर्स ऑफ इंडियाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचता आले. शेतीविषयीची विचाराधारा बदलविण्यात फालीची मोठी भूमिका आहे. फाली हे ग्रामीण भागात, शेती व शेतीपूरक उद्योग क्षेत्रात करिअर करू पाहणाऱ्यांसाठी उत्प्रेरक म्हणून कार्य करत असल्याचे फाली असोसिएशनचे अध्यक्ष तथा जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. चे उपाध्यक्ष अनिल जैन म्हणाले.

जैन हिल्सवर भरलेल्या फ्युचर ॲग्रीकल्चर लिडर्स ऑफ इंडिया फाली या उपक्रमाच्या अकराव्या संमेलनात पत्रकार परिषदेत अनिल जैन बोलत होते. पत्रकारांशी संवाद साधताना अनिल जैन त्यांच्यासोबत ॲग्री ॲण्ड आयटी बिझनेसेसचे ग्रुप हेड शिवकुमार एस, फालीच्या संचालिका नॅन्सी बॅरी उपस्थित होते.



#### १८० शाळांमधून 'फाली'चे कार्य सुरू

अनिल जैन म्हणाले की, देशभरात १८० शाळांमधून फालीचे कार्य गेल्या ११ वर्षांपासून सुरू असून आतापर्यंत ५० हजार विद्यार्थ्यांपर्यंत संवाद साधून शेतीबद्दल आवड निर्माण करण्यात आम्ही यशस्वी झालेलो आहोत. यंदा अकराव्या फाली संमेलनात महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान मधून ११०० विद्यार्थी आलेले आहेत.

## सिडकोच्या घरांच्या किमती कमी कराव्यात

### मनसेच्या नेतृत्वाखाली आंदोलन

**नवी मुंबई :** सिडकोच्या २६ हजार घरांच्या सोडतीतील घरे अत्यंत महाग असल्याने या किमती कमी कराव्या या मागणीसाठी सिडको सोडतधारकांनी मनसे प्रवक्ते व शहर अध्यक्ष गजानन काळे यांच्या नेतृत्वाखाली मागील तीन महिन्यांपासून आंदोलन सुरू आहे. मात्र राज्य सरकार व सिडको मार्फत त्याबाबत कोणताही निर्णय घेतला जात नसल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

म्हाडातर्फे जवळपास ५०० चौ. फुटांचे घर कुर्ला येथे साधारण ५० लाखांना विकले जात आहे. तर



सिडको केवळ २९१ चौ. फुटांचे घर वाशीमध्ये ८६ लाखांना, खारघर, कळंबोली येथे साधारणतः ५० लाखांना विकत आहे. म्हाडाची घरे सिडको पेक्षा तुलनेने कमी असून सुद्धा घरांच्या किंमती कमी व्हाव्यात म्हणून म्हाडाने समिती गठीत केली आहे. परंतु सिडको असा कोणताही निर्णय घेत नाही हे दुर्दैवच नाही, तर लोकप्रतिनिधींचे सुद्धा अपयश आहे, असा घणाघात काळे यांनी केला.



## भिवंडीत खेळण्याचे स्टेडियम बनले डेब्रिजचे ग्राऊंड

### कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त

**भिवंडी :** भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. ४ च्या कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असलेल्या स्व. परशराम धोंडू टावरे स्टेडियममधील मैदानाची आणि इमारतींची दिवसेंदिवस दूरवस्था होत आहे. त्या मैदानातील जागेवर शहरातील माती आणि डेब्रिज साठविण्याचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू असल्याने परिसरातील नागरिकांनी आणि खेळाडूंनी संताप व्यक्त केला.

स्व. परशराम टावरे स्टेडियम लगत भिवंडी महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्र. ४ चे कार्यालय आहे. दररोज या स्टेडियम मधील रस्त्यावरून प्रभाग कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी आपल्या कार्यालयात ये-जा करतात. असे असताना स्टेडियमच्या मैदानात डेब्रिज आणि माती आणून टाकणाऱ्यांवर प्रभाग अधिकारी कडून कारवाई केली जात नाही.

> स्व. परशराम टावरे स्टेडियम मैदानात भिंतीलगत डेब्रिजचा कचरा साठविल्याबाबत आमच्याकडे नागरिकांच्या आणि माजी नगरसेवकांच्या तक्रारी आल्या आहेत. यावर कारवाई करून हा कचरा हटविला जाणार आहे. त्याचबरोबर हे कृत्य करण्याला प्रोत्साहित करणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.
> - **बाळकृष्ण क्षीरसागर**, उपायुक्त, भिवंडी पालिका

स्थानिक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील अनेक ठेकेदार जुन्या इमारती पाडतात आणि त्या इमारतींचे डेब्रिज, माती आणि इतर कचरा थेट या स्टेडियमच्या भिंतींच्या लगत आतल्या बाजूला टाकतात. नंतर तो चढ्या किमतीत विकतात.

#### तब्बल ११५५.३७१ दशलक्ष युनिट विजेची निर्मिती

## कोयनेतून दोन महिन्यांत विक्रमी वीजनिर्मिती

**कराड :** राज्यातील एक महत्त्वपूर्ण धरण व जलविद्युत प्रकल्प असलेल्या साताऱ्यातील पाटण तालुक्यातील कोयना जल विद्युत प्रकल्पातून मार्च, एप्रिल या अवघ्या दोन महिन्यांत रेकॉर्डब्रेक अशी तब्बल ११५५.३७१ दशलक्ष युनिट वीजनिर्मिती झाली.

एक जूनपासून सुरू झालेल्या धरणाच्या तांत्रिक जलवर्षात आत्तापर्यंत एकूण २८६६.१४१ दशलक्ष युनिट वीजनिर्मिती झाली. त्यापैकी फेब्रुवारीपर्यंतच्या नऊ महिन्यांत १७१०.७७०, तर अवघ्या मार्च, एप्रिल या दोन महिन्यांत ११५५.३७१ दशलक्ष युनिट वीजनिर्मिती झाली. या दोन महिन्यांत पश्चिमेकडे २४.४६, तर पूर्वेकडे सिंचनासाठी ११.१७ अशा एकूण ३५.६३ टीएमसी पाण्यावर ही वीजनिर्मिती करण्यात आली आहे.

गतवर्षी कोयना धरणात ११२ टीएमसी पाण्याची आवक झाली. सिंचनासाठी ऐतिहासिक ३८ टीएमसी पाणीवापर झाला होता. कमी पाणी साठ्यामुळे ऐन उन्हाळ्यात पश्चिम वीजनिर्मितीच्या लवादाला कात्री लागल्याने वीजनिर्मिती कमी झाली होती. यावर्षी धरणात १८३.६१ टीएमसी पाण्याची आवक, तर अकरा महिन्यानंतरही धरणात अपेक्षित पाणीसाठा शिल्लक आहे.

मार्च व एप्रिल या दोन महिन्यांत पश्चिमेकडे २४.४६ टीएमसी पाण्यावर पोफळी टप्पा एक व दोन मधून १९९.७५२ दशलक्ष युनिट, कोयना चौथा टप्पा ७१२.१९५ दशलक्ष युनिट, अलोरे वीजगृह १९४.८९८ दशलक्ष युनिट अशी ११०६.८४५ दशलक्ष युनिट, तर पूर्वेकडे सिंचनासाठी सोडण्यात आलेल्या ११.१७ टीएमसी पाण्यावर धरण पायथा वीज गृहातून वीजनिर्मिती करून ४८.५२६ दशलक्ष युनिट अशी एकूण ३५.६३ टीएमसी पाण्यावर ११५५.३७१ दशलक्ष युनिट वीजनिर्मिती करण्यात आली आहे.

ऐन उन्हाळ्यात राज्याला भारनियमनाच्या त्रासापासून सार्वत्रिक दिलासा देण्यात व शेती व पिण्यासाठी सिंचनाला प्राधान्य देत निम्म्याहून अधिक महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश राज्यांची सिंचनाची गरज भागवणारे हे कोयना धरण निश्चितच सार्वत्रिकदृष्ट्या सकारात्मक ठरत आहे.

#### गतवर्षीपेक्षा ६६६ दशलक्ष युनिट जादा वीजनिर्मिती

गतवर्षी धरणात कमी प्रमाणात पाण्याची आवक झाली असतानाही फेब्रुवारी अखेर या वर्षाच्या तुलनेत जादा वीजनिर्मिती झाली होती. मात्र ती तूट भरून काढत या दोन महिन्यांत धरणातील पाण्यावर तब्बल ११५५ दशलक्ष युनिट वीजनिर्मिती झाली आहे. तर गतवर्षीच्या तुलनेत आतापर्यंत तब्बल ६६६ दशलक्ष युनिट जादा वीजनिर्मिती झाली.



# माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंग पुन्हा होणार सुरू?



**माथेरान**

माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंगसारख्या साहसी खेळांना पुन्हा सुरुवात करण्यासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपकडून केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांची, तर आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची

## राजकीय हालचालींना वेग

भेट घेतली. शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी देखील खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांच्यासोबत चर्चा करून सकारात्मक आश्वासन मिळवल्याचा दावा केला आहे.

एकेकाळी परवानगीविना सुरू झालेल्या या खेळात अनियंत्रितपणे अनेकांनी उडी घेतली. मोठ्या उत्पन्नाच्या आशेने राजकीय पाठबळ असलेले काही गट यात उतरले. परिणामी वाद वाढले आणि अखेर वन विभागाने सर्वच व्हॅली क्रॉसिंग बंद केल्या. आज बेरोजगारीच्या छायेत असलेल्या माथेरानच्या तरुणांना या खेळाच्या पुनःप्रारंभाची आशा आहे. मात्र सोशल मीडियावर श्रेयवादाने वादळ उठवले आहे. हा खेळ कोणाच्या मक्तेदारीचा नाही, रीतसर परवानगी घेऊन कायमस्वरूपी सुरू करा, अशी मागणी होत आहे. पण सुरुवात होण्याआधीच राजकीय श्रेयाच्या लढाया झडू लागल्या आहेत.

### हे प्रश्न अजूनही अनुत्तरित

- कायदेशीर परवानगी कोणत्या अटींवर दिली जाणार?
- सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार?
- नियंत्रण यंत्रणा कोण चालवणार?
- तरुणांना समान संधी मिळणार का?

# ठाण्यात लाडक्या लेकी हुश्शार!

## जिल्ह्याचा बारावीचा निकाल ९३.७४ टक्के

**ठाणे :** ठाण्यात यंदा बारावीच्या परीक्षेत लाडक्या लेकींनीच बाजी मारल्याचे निकालावरून स्पष्ट झाले आहे. सोमवारी उच्च माध्यमिक महाविद्यालयाचा अर्थात बारावीचा निकाल ऑनलाइन जाहीर झाला. या निकालात ठाणे जिल्ह्यात पुन्हा मुलीच ह ुशार ठरल्या आहेत. ठाणे जिल्ह्याचा निकाल मागील वर्षीच्या तुलनेत यंदा १ टक्क्याने वाढला असून ९३.७४ टक्के लागला आहे. यामध्ये जिल्ह्यात ९५.०६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या असल्याची माहिती ठाणे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी दिली.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सन २०२४ -२५ चा इयत्ता बारावीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. यंदा ठाणे जिल्हाचा निकाल ९३.७४ टक्के लागला आहे. यंदाच्या वर्षी ठाणे जिल्ह्यातून बारावीच्या परिक्षेला ४९ हजार ०१ मुले आणि ४७ हजार ८८ मुली असे एकूण ९६ हजार ०८९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ८९ हजार ८२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील उत्तीर्ण झालेल्या ८९ हजार ८२७ विद्यार्थ्यांमध्ये ४५ हजार १७० मुले आणि ४४ हजार ६५७ मुलींचा समावेश आहे.



### डोंबिवलीतील 'होली अँजेल्स'चा शंभर टक्के निकाल

बारावीच्या निकालात डोंबिवलीतील होली अँजेल्स ज्युनियर महाविद्यालयाने सलग १८व्या वर्षी शंभर टक्के निकालाची उज्ज्वल कामगिरी कायम ठेवली. यावर्षी एकूण १५५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यामध्ये विज्ञान व वाणिज्य शाखांचा समावेश होता. दोन्ही शाखांतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून, वाणिज्य शाखेतील शुक्ला श्रेया विजय प्रताप हिने ९४.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. सानवी प्रसन्न शेट्टीने (९२.६७ टक्के) द्वितीय क्रमांक, तर खुशी संजय जयस्वालने (९१.८३ टक्के) तृतीय क्रमांक मिळवला. कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात एकूण ९२.५१ टक्के निकालाची नोंद झाली आहे. यामध्ये मुलींची सरासरी ९३.७१ टक्के असून, मुलांची सरासरी ९१.३८ टक्के इतकी आहे.

### पोलादपूरमध्ये आदित्य सावंत प्रथम

पोलादपूर तालुक्यातून विद्यामंदिर पोलादपूरचा आदित्य राकेश सावंत कला शाखेत ९२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. कापडे येथे स्नेहा निकम ही ७०.५० टक्के गुण मिळवून श्री वरदायिनी उच्च माध्यमिक विद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. वाणिज्य शाखेमध्ये वेदिका शिंदे हिने ८७.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, साहिल पालकरने ८६.१७ टक्के मिळवून द्वितीय, पियूष पवार याने ८०.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. विज्ञान शाखेमध्ये सानिका शिर्केने ६९ टक्के गुण मिळवून प्रथम, साक्षी जाधवने ६५ टक्के गुण मिळवून द्वितीय, हर्षदा तांबेने ६४.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

### नमुंमपा क्षेत्रातील विद्यार्थी सरस

यंदाच्या वर्षी ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विद्यार्थी बारावी परीक्षेच्या निकालात सरस ठरले आहेत. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातून १५ हजार ७१० विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. त्यापैकी १५ हजार ०७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे या महापालिका क्षेत्रात बारावीचा निकाल ९५.९४ टक्के इतका लागला आहे. उत्तीर्ण झालेल्या १५ हजार ०७३ विद्यार्थ्यांमध्ये ७ हजार ९४२ मुलांचा, तर ७१३१ मुलींचा समावेश आहे.

### पालघरचा निकाल ९२.१९ टक्के

पालघर जिल्ह्यातील एकूण ५०६८७ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी २४,९३६ मुले आणि २१,७९३ मुली असे एकूण ४६,७२९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पालघर जिल्ह्याचा एकूण ९२.१९ टक्के निकाल लागला आहे.

### बदलापुरात मुलींची बाजी

बदलापुरातील आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयातील मुलींनी यंदाही बाजी मारली आहे. मुलींनी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत पहिला क्रमांक पटकावला आहे. विज्ञान शाखेत यश शैलेश धोत्रे या विद्यार्थ्याने मिळविलेला दुसरा क्रमांक वगळता तिन्ही शाखांमध्ये द्वितीय व तृतीय क्रमांकही मुलींनीच पटकावले आहेत. बारावीच्या परीक्षेत आदर्श महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा निकाल ९९ .६७ टक्के, विज्ञान शाखेचा निकाल ९६ टक्के, तर कला शाखेचा निकाल ८२.७२ टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेत आदर्श महाविद्यालयातील श्रुती सुनील शिंदे ही विद्यार्थिनी ९३.५० टक्के गुण मिळवून प्रथम आली, तर वेदिका रवींद्र म्हसकर (९२.६० टक्के) व नेत्रा संतोष शिंदे (९२.३३ टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. विज्ञान शाखेत ८८.६६ टक्के गुण मिळवून प्रांजल मिनेश तांबे ही विद्यार्थिनी प्रथम आली. तर यश शैलेश धोत्रे (८७.३३ टक्के) व कस्तुरा राहुल जाधव (८४.६७ टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. कला शाखेत ९२.३३ टक्के गुण मिळवून विद्या अनिल कालिंबे ही विद्यार्थिनी आदर्श महाविद्यालयातून प्रथम आली. तर हर्षदा किसान चौधरी (८४.८३ टक्के) व अक्षरा विनोद चव्हाण (७८.३३ टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे.

### मीरा-भाईंदरचा निकाल ९५.30 टक्के

मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत बारावीचा निकाल ९५.३० टक्के लागला आहे. मागील काही वर्षांतील हा सर्वात चांगला निकाल आहे. यंदाही मुलांपेक्षा मुलींनी बाजी मारली आहे. विज्ञान, कला व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी मिळून परीक्षेत मीरा-भाईंदरमधील ७३३१ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत, त्यात ३,६७२ मुले व ३६५९ मुली आहेत. त्यातील मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.१३ टक्के, तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९४.४९ टक्के आहे. निकालात ठाणे जिल्हात मीरा-भाईंदर तिसऱ्या स्थानी आहे.

### रायगडमध्ये ९४ .६६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

**अलिबाग :** बारावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्यातील ९४.६६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा ०.१७ टक्क्यांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात घट झाली आहे. निकालात मुलांच्या तुलनेत मुलींनी बाजी मारली असून, मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.४९ टक्के, तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९२.९१ टक्के इतके आहे. बारावीच्या परीक्षेसाठी रायगड जिल्ह्यातून २९ हजार ४९३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी २९ हजार ४१७ विद्यार्थी परिक्षेला सामोरे गेले. यामधील २७ हजार ८४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, १ हजार ५६९ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९४.६६ टक्के इतके आहे. जिल्ह्यात सर्वात जास्त निकाल ९९.४८ टक्के तळा तालुक्याचा लागला असून, सर्वात कमी ८४.०९ टक्के निकाल श्रीवर्धन तालुक्याचा लागला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा ०.१७ टक्क्यांनी बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणात घट झाली आहे. मागील वर्षी जिल्ह्यातील ९४.८३ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते, तर यंदा ९४.६६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# नवी मुंबई-वर्ल्ड ट्रेड सेंटर बससेवा कपात

## प्रवाशांचे प्रचंड हाल

**नवी मुंबई**

नवी मुंबईहून मुंबईतील वर्ल्ड ट्रेड सेंटर (कफ परेड) दरम्यान चालविली जाणारी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन (एनएमएमटी) बस सेवा अचानक कपात केल्याने दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. अनेक वेळा विनंती आणि निवेदने दिल्यानंतरही एनएमएमटी अधिकाऱ्यांकडून किंवा नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडून (एनएमएमसी) कोणतीही कारवाई झालेली नाही.

याआधी, नवी मुंबईहून वर्ल्ड ट्रेड सेंटरपर्यंत प्रत्येक मार्गावर चार बस धावत होत्या; परंतु अलीकडे त्या संख्येत कपात करून केवळ एक किंवा दोन बसच सुरू ठेवल्याने प्रवाशांची मोठीच गैरसोय होत असून त्यांचा दैनंदिन प्रवास विस्कळीत झाला आहे.

याबाबत अनेक प्रवाशांनी



### निधीअभावी घेतला निर्णय

मार्ग क्रमांक १०८ वरील दुसऱ्या बसचे नियमित प्रवासी असलेले वकील श्याम कल्याणकर यांनी सदर सेवा कपात करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे. तुर्भे एनएमएमटी डेपोचे व्यवस्थापक सुनील जगताप यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केल्यानंतर, कल्याणकर यांनी या अचानक झालेल्या सेवा रद्दबाबत मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिला. या निर्णयामागे मोठे आर्थिक नुकसान आणि निधीअभावी घेतलेला निर्णय असल्याचे डेपो व्यवस्थापकांनी सांगितले.

एनएमएमटीचे महाव्यवस्थापक योगेश कदमस्कर आणि एनएमएमसी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही.

# जनार्दन आत्माराम भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

## भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल :** पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती, समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथीनिमित्त ०७ मे २०२५ रोजी सायंकाळी ०६ वाजता उलवे नोडमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी नुकतेच येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यामध्ये विशेषत्वाने पनवेल तालुकास्तरीय 'स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५'चे बक्षीस वितरण तसेच शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणिजनां चा पारितोषिक सन्मान समारंभ त्याचबरोबरीने 'मराठी पाऊल पडते पुढे' या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले .



### ७ मे रोजी कार्यक्रम

७ मे रोजी सायंकाळी ६ वाजता उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे हा पुण्यतिथी व सत्कार समारंभ कार्यक्रम होणार असून या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती लाभणार असून माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, मंडळाचे सचिव परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, सभासद वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार असल्याची माहिती जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी दिली.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेस आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुण भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, भाजपचे नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

# ठाणे पालिकेची मालमत्ता कर वसुली सुसाट

## एका महिन्यात ९५ कोटींची वसुली

**ठाणे :** तिजोरीत खडखडाट असलेल्या पालिकेला मालमत्ता कराच्या वसुलीने तारले असून अवघ्या तीस दिवसांत मालमत्ता कर विभागाने ९५ कोटींची विक्रमी वसुली केली आहे. ठाणे महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने यंदा एप्रिल महिन्यात मालमत्ता कराची बिले वितरीत केल्याचा चांगला परिणाम दिसून आला आहे. अवघ्या एका महिन्यात या विभागाने ९५ कोटींची वसुली करून दमदार कामगिरी केली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत १२ कोटींची अधिकची वसुली झाल्याचे दिसून आले आहे.





मागील वर्षी मालमत्ता कर विभागाला ८५० कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार सरत्या आर्थिक वर्षात या विभागाने ८१० कोटींची वसुली केली आहे. ९५ टक्क्यांच्या आसपास मालमत्ता कराची वसुली झाली असली तरी, गेल्यावर्षीच्या तुलनेत या कर वसुलीत १०८ कोटी रुपयांनी वाढ झाल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला होता. यंदाच्या वर्षात म्हणजे च २०२५-२६ या आर्थिक वर्षात पालिकेने मालमत्ता कर विभागाला ८१९ कोटी ७१ लाख रुपयांच्या करवसुलीचे उद्दिष्ट दिले आहे. त्यानुसार मालमत्ता कर विभागाने १ एप्रिलपासूनच पावले उचलली आहेत. १ एप्रिल पासूनच मालमत्ता कराच्या बिलांचे वितरण या विभागाकडून करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून पहिल्याच दिवशी सुमारे १५७० ठाणेकर करदात्यांनी १ कोटी ८० लाख रुपयांच्या मालमत्ता कराचा भरणा केला होता.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यम प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

१ २ ३ ४ ५ ६

स्मृती दिन



जातीभेदाविरुद्ध लढा देणारे राजर्षी शाहू महाराज यांचा ६ मे रोजी स्मृतीदिन.

## मुंबई तिसऱ्या क्रमांकावर!

रायगड अव्वल

**मुंबई:** बारावी निकालामध्ये मुंबई विभागाने राज्यात ९२.९३ टक्क्यांसह तिसरा क्रमांक मिळवला आहे. मुंबई मंडळातील सहा जिल्ह्यांमध्ये रायगड जिल्ह्याने बाजी मारली आहे. तर दक्षिण मुंबईचा निकाल सर्वात कमी लागला आहे. राज्याप्रमाणे मुंबई विभागामध्येही मुली या मुलांपेक्षा सरस ठरल्या आहेत.

मुंबई मंडळाच्या रायगड जिल्ह्यातील २९ हजार ४९३ विद्यार्थ्यांपैकी २७ हजार ८४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९४.६६ टक्के निकाल लागला आहे. खालोखाल ठाण्याचा निकाल ९३.७४ टक्के लागला असून, ठाण्यातून ९६ हजार ८९ विद्यार्थ्यांपैकी ८९ हजार ८२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुंबई पश्चिम उपनगरने ९३.१८ टक्क्यांसह तिसरा क्रमांक पटकावला आहे. पश्चिम उपनगरातील ६४ हजार ८६६ विद्यार्थ्यांपैकी ६० हजार २९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुंबई पूर्व उपनगरमधील ३७ हजार ३४६ विद्यार्थ्यांपैकी ३४ हजार ३१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने हा जिल्हा ९२.२७ टक्क्यांसह चौथ्या क्रमांकावर आहे. पालघर जिल्ह्यातील ५० हजार ८७० विद्यार्थ्यांपैकी ४६ हजार ७२९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. पालघरचा निकाल ९२.१९ टक्के इतका लागला आहे. मुंबई शहराचा सर्वात कमी (९०.६७ टक्के) निकाल लागला आहे. मुंबई शहरातून ३६ हजार ४५४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. पैकी ३२ हजार ९३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

मुंबई मंडळातून बारावी परीक्षेसाठी ३ लाख १५ हजार ११८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील ३ लाख १४ हजार १४४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. २ लाख ९१ हजार ९५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ९२.९३ टक्के आहे. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १ लाख ६० हजार ९६९ मुले होती. पैकी १ लाख ४७ हजार ४५२ उत्तीर्ण झाले आहेत. मुलांचे उत्तीर्णतेचे प्रमाण ९१. ६० टक्के आहे. तर मुली १ लाख ५३ हजार १७५ बसल्या होत्या. त्यापैकी १ लाख ४४ हजार ५०३ उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींची उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.३३ टक्के आहे.

परीक्षेस नऊ विभागीय मंडळांमधून सर्व शाखांमधून ७,३१० दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७,२५८ विद्यार्थी परीक्षेस पात्र झाले.



(छायाचित्र – विजय गोहिल)

### गतवर्षीच्या तुलनेत मुंबईच्या निकालात वाढ

राज्य मंडळाने जाहीर केलेल्या नऊ विभागांच्या निकालामध्ये मुंबई तिसऱ्या क्रमांकावर असली तरी मागील तीन वर्षांमध्ये मुंबईच्या निकालामध्ये सातत्याने वाढ होत आहे. २०२३ मध्ये मुंबईचा निकाल ८८.१३ टक्के इतका लागला होता. २०२४ मध्ये ९१.९५ टक्के इतका लागला तर यंदा बारावीचा निकाल ९२.९३ टक्के लागला आहे. परिणामी मागील काही वर्षे विभागीय निकालात तळाशी असलेल्या मुंबई विभागाची उल्लेखनीय कामगिरी झाली आहे.



राम नारायण रुईया महाविद्यालयाच्या (विज्ञान शाखा) अयती आणि आरुषी सिन्हा अव्वल ठरल्या.



### विज्ञान शाखेचा सर्वाधिक निकाल

मुंबईमधून विज्ञान शाखेचे निकाल सर्वाधिक ९६.३३ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेतून १ लाख १७ हजार ९३२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील १ लाख १३ हजार ४१० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्याखालोखाल वाणिज्य शाखेचा निकाल ९२.५९ टक्के लागला असून, वाणिज्य शाखेतून १ लाख ५३ हजार ३५४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील १ लाख ४१ हजार ५३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. व्यवसाय अभ्यासक्रमासाठी २ हजार ९०४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील २ हजार ६२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, उत्तीर्णतेचे प्रमाण ९१.३४ टक्के इतके आहे. त्याखालोखाल कला शाखेतील ४० हजार ७१ विद्यार्थ्यांमधून ३३ हजार ७१३ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने ८४.६३ टक्के निकाल लागला आहे. सर्वात कमी निकाल आयटीआय शाखेचा ७८.२८ टक्के इतका लागला आहे. आयटीआय शाखेतून ८५७ विद्यार्थ्यांपैकी ६६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



### महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील बारावीच्या निकालाची यशस्वी कारकीर्द

महाराष्ट्र जीत:दिलीप मादाळे

मुखेड शहरातील वीरभद्र शिक्षण संस्था संचलित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील कला , वाणिज्य , विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रमाच्या निकालाची परंपरा कायम राखण्यात यश मिळवले आहे . तालुक्यातील जुने महाविद्यालय म्हणून तालुक्यातील पालक , विद्यार्थ्यांचा दृढ विश्वास या महाविद्यालयावर आहे . तो सार्थ ठरवण्यासाठी प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे , उपप्राचार्य प्रा. एस.बी.बळवंते , पर्यवेक्षक प्रा.जी.एम.वायफणकर यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने विद्यार्थी अथक परिश्रम करून यश मिळविण्यात आले . महाविद्यालयाचा एकुण निकाल 94.33 टक्के जाहीर झाला आहे .

बारावी विज्ञान शाखेचा निकाल 98.57 टक्के लागला आहे . यामध्ये प्रथम कु.गोरे रूपाली दत्तात्रय (80.50 ) , द्वितीय कु.अंकलगे अनुष्का दिगांबर (77.76 ) , तृतीय कु . किरकण संध्या बळीराम (76.50 ) व कला शाखेचा निकाल 88.75 टक्के लागला आहे . ज्यामध्ये प्रथम क्रमांक कु.शिंगणवाड वैष्णवी किशनराव (78.33 ), द्वितीय जाहीरे बालाजी मालेश (74.33 ), तृतीय कु.यमुलवाड समीक्षा अरुण (73.50) आणि वाणिज्य शाखेचा निकाल 94.33 टक्के आहे . प्रथम कु.सूर्यवंशी अश्विनी प्रल्हादराव ( 77.83 ) , कु.जाधव प्रतीक्षा संजय ( 77.83 ), द्वितीय कु.कांबळे अश्विनी मारोती (76.83) , तृतीय कु.शिंदे मुक्तेश्वरी मारोती (73.50) तसेच व्यवसाय अभ्यासक्रमाचा सुद्धा निकाल 89.83 टक्के इतका लागला आहे . प्रथम क्रमांक माळगे गजानन गंगाधर ( 62.17 ) , द्वितीय क्रमांक देवशेटे शुभम धोंडीबा ( 59.00 ) , तृतीय क्रमांक देवशेटे संगमेश्वर धोंडीबा ( 58.17 ) प्राप्त करून महाविद्यालयाचे नावलौकिक करण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे .

या यशाबद्दल वीरभद्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पाटील हंगरगेकर , सचिव रणजित पाटील हंगरगेकर , सर्व पदाधिकारी , संचालक मंडळ , प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे , उपप्राचार्य प्रा.एस.बी. बळवंते , महाविद्यालयीन परिवारांकडून यशवंताचे अभिनंदन करून कौतुक करण्यात आले .

## बसपा ची विधानसभा कार्यकारणी जाहीर..

### अध्यक्षपदी दीपक वानखडे उपाध्यक्ष प्रकाश पाटील नियुक्त.



कारंजा / प्रतिनिधी पक्षपातळीवर राज्यात सर्वाधिक मते घेणाऱ्या का। कारंजा मानोरा विधानसभा मतदारसंघाची कार्यकरणी नुकतीच जाहीर करण्यात आली. स्थानिक विश्राम गृहात संपन्न बैठकीला अध्यक्ष म्हणुन जिल्हा प्रभारी भाऊराव वासनिक होते तर प्रमुख उपस्थिती म्हणुन जिल्हाध्यक्ष अँड. राहुल गवई यांची उपस्थिती होती यावेळी बसपा ची चळवळीचे अनेक कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते यात जिल्हाध्यक्ष अँड राहुल गवई यांनी विधानसभा क्षेत्राच्या पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या दिल्यात त्यात सर्वानुमते विधानसभा क्षेत्र अध्यक्ष म्हणुन बसपा चे कट्टर समर्थक दीपक वानखडे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष म्हणुन माजी विधानसभा अध्यक्ष प्रकाश पाटील यांची निवड करण्यात आली त्याबरोबर विधानसभा क्षेत्रात विविध पदावर नियुक्तया करण्यात आल्या त्यात जिल्हा सचिव म्हणुन बदलू वाहणे, विधानसभा क्षेत्र महासचिव म्हणुन डॉ पवनकुमार देशमुख, संघटक राहुल इंगळे शहराध्यक्ष म्हणुन प्रशांत लेव्हे यांची नियुक्ती करण्यात आली .निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यां ना जिल्हाध्यक्ष एड. राहुल गवई यांनी नियुक्त पत्र देऊन त्याचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत लेवे यांनी तर आभार दीपक वानखडे यांनी मानले.



### केंद्रप्रमुख चौधरी साहेबांकडून शाळेतील झाडांना पाणी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश



**महाराष्ट्र जीत / विक्रांत शिरसाट**

केंद्रप्रमुख श्री. चौधरी साहेब यांनी स्वतः पुढाकार घेत शाळेतील झाडांना पाणी घालून पर्यावरण संवर्धनाचा अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी संदेश दिला आहे. त्यांच्या या कृतीमुळे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. शाळेच्या आवारात सकाळी सुर्योदयाच्या साक्षीने झाडांना पाणी घालताना चौधरी साहेबांचे समर्पण भाव स्पष्ट दिसत होते. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारची प्रत्यक्ष कृती होत असल्याने सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. "सतत मार्गदर्शन करणारे अधिकारीच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीतून नेतृत्व करणारेच खरे प्रेरणास्थान ठरतात," असे मत स्थानिकांनी व्यक्त केले.

## मंगरुळपीर तालुक्याचा 94.44 टक्के निकाल

### कासोळा येथील क. महाविद्यालय विज्ञान व कला शाखेचा १०० टक्के निकाल...

महाराष्ट्र जीत.... प्रतिनिधी.... अजय भगत.....मंगरूळपीर....

मंगरूळपीर : : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे व्दारा घेण्यात आलेल्या फेब्रुवारी- मार्च २०२५ मको घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वीचा निकाल जाहिर झाला असून त्यामध्ये मंगरूळपीर तालुक्याचा निकाल 94.44 टक्के एवढा लागला आहे. तालुक्यातील एकूण 27 कनिष्ठ महाविद्यालयात 2070 नियमित विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली असता त्यामधून 1955 विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहे. वसंतराव नाईक महाविद्यालय मंगरूळपीर येथील वाणीज्य शाखेचा निकाल 100 टक्के तर कल शाखेचा 83.52 टक्के एवढा निकाल लागला आहे तर एम. सी. ठाकरे कला महाविद्यालय कासोला येथील विज्ञान व कला शाखेचा निकाल 100 टक्के लागला आहे. एन. बी. शेळके क.म. कुंभी येथील विज्ञान शाखेचा 100 निकाल विज्ञान असून शेलुबाजार के.डी. चांडे क.म. म. विज्ञान शाखेचा 100% तसेच शेलुबाजार येथील लक्ष्मीचंद कनिष्ठ माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान व वाणिज्य शाखेचा 100 टक्के, धानोरकर आदर्श क. विद्यालय धानोरा येथील विज्ञान शाखेचा 100 टक्के भगवंत महाकाळ.महाविद्यालय मानोली येशील विज्ञान शाखेचा 100 टक्के एवढा निकाल लागला आहे, तसेच गुरुकुल इन्टर नॅशनल पब्लीक स्कूल क. महाविद्यालय इचा या शाळेतील विज्ञान शाखेचा सुद्धा निकाल 100 टक्के लागला आहे. तालुक्यातून सर्वात जास्त (दोन्ही शाखचा) निकाल श्री एम. सी. ठाकरे .म. कासोळा यांचा लागला असून वाणीज्य शाखेतून सर्वात कमी निकाल 25%, सुधाकर नाईक क. महाविद्यालयाचा लागला आहे.100 टक्के निकाल मधील के.डी.चांडे विद्यालय या शाखेतून 14 तर गुरुकुल इंटरनॅशनल पब्लिक स्कूल इचा येथुन 17 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती यापैकी सर्व विद्यार्थी पास झाले

### त्रिंबकदास पटेल उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९६% विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे

थेरगाव येथील त्रिंबकदास पटेल उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल यंदा ९६% लागला असून यामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विज्ञान शाखेत कु. हर्षदा सतीश म्हस्के – ८५.००% (प्रथम) कु. स्मिता रमेश काळे – ७९.००% (द्वितीय) कु. नम्रता परमेश्वर कणके – ७८.५०% (तृतीय) कला शाखेत कु. पूजा बप्पासाहेब राऊत – ७०.१७% (प्रथम) कु. राधिका भाऊसाहेब ताकपीर – ७०.१७% (द्वितीय) कु. तन्वी दीपक वाघ – ६९.३३% (तृतीय) कु. मनीषा संतोष वाघमारे – ६८.८३% शाळेतून एकूण ८ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, तर ८० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. यावर्षी राज्य परीक्षा मंडळाने राबविलेल्या १००% कॉपीमुक्ती अभियानाच्या पार्श्वभूमीवर देखील शाळेने आपली गुणवत्ता सिद्ध करत, निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे माजी मंत्री तथा ताराई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अनिल पटेल, निवृत्त पोलीस उपयुक्त व संस्थेचे उपाध्यक्ष श्री. सुभाष पटेल, सचिव श्रीमती रंजना पाटीदार, संचालक श्री. निमेश पटेल, प्राचार्य श्री. सुरेश पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे विशेष अभिनंदन केले.




### हफ्ते खोर पोलिसामुळे सिंदखेडराजा तालुक्यात अवैध धंदे सुरूच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे ही दुर्लक्ष

**बुलढाणा : उमेश एखंडे**

सिंदखेड राजा तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक ठीक ठिकाणी दारू विक्री चालू आहे काही रोडवर टपऱ्या टाकून दारू विकतात या मुळे सामान्य जनतेला खूप त्रास होत आहे तरुण मुले व्यसनधीन होण्याचे कारण दारू आहे अनेक ठिकाणी भांडण मारामाऱ्या, काही महिलांचा सुखात चालू असलेला संसार दारू मुळे नष्ट होतो तालुक्यातील वडाळी येथील दारू विक्रेत्याला गावातील महिलांनी दारू विकु नको असे सांगितले तर ते म्हणतात की आम्ही पोलिसांना हफ्ते देतो त्यामुळे आमचं कोणी काही वाकड करू शकत नाही असे सांगितले म्हणून सरपंच कृषिवर्ता काकडे सह गावातील महिला व पुरुष मंडळी सिंदखेड राजा पोलीस स्टेशन मध्ये धडकल्या आणि शेळके ठाणेदार यांना 2 मे रोजी निवेदन दिलं की दारू बंद करण्याची मागणी केली व ग्रामपंचायत चा ठराव घेऊन दारू बंद न झाल्यास बेमुदत उपोषण करण्यात येईल अशा इशारा सुद्धा देण्यात आले वरिष्ठ अधिकारी यांना निवेदन देऊन सुद्धा पोलीस कर्मचारी हफ्ते घेऊ खुले आम दारू विका म्हणून दारू विक्रेत्यास सांगत आहे का असे गावकरी मंडळी म्हणत आहे गावामध्ये जिल्हा परिषद शाळेजवळ खुलेआम दारू विक्री केली जाते याचा परिणाम गावातल्या शाळेतील मुलांना होतो काही गावतली लोक भांडणं करतात तर काहींचे संसार उध्वस्त होतात आमचे सर्व गावकरी मंडळीची म्हणणे आहे की दारू बंद झालीच पाहिजे हे पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने ही दारू सुरू आहे दारू इकडे ते म्हणतात की पोलीस आम्ही त्यांना हप्ते देतो तुम्हाला काय करायचं ते करा ही दारू जर बंद झाली नाही तर आम्ही बेमुदत उपोषण करणार आहोत याची नोंद घ्यावी त्यावेळी सिंदखेड राजा पोलीस स्टेशन मध्ये यावेळी रामभाऊ काकडे, सूर्यकांत काकडे, राजूसाबळे, अंभोरे, मच्छिन्द्र झिरपे,रमेश मुंडे कैलास काकडे, दिलीप काकडे,पंडित का, चंद्रकांत का, रामेश्वर काकडे,उद्धव काकडे, याच्या गावातील अनेक महिला व पुरुष उपस्थित होते



### नांदेडात विजेच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचे थैमान- हवामान खात्याचा इशारा

**महाराष्ट्र जीत दिलीप मादाळे**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी काल 5 मे रोजी दुपारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दिनांक 7 व 8 मे 2025 हे दोन दिवस येलो (Yellow) अलर्ट जारी केलेला आहे. दिनांक 7 व 8 मे हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 30 ते 40 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. या गोष्टी करा : विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. या गोष्टी करु नका: आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका.

# मंगरूळपीर शहरात होणारा बालविवाह युवा रुरलने रोखला

कारंजा/ प्रतिनिधी मंगरूळपीर -वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर येथे एका 17 वर्षीय मुलीचा बालविवाह होणार असल्याची माहिती युवा रुरल असोसिएशनचे जिल्हा समन्वयक दिवाकर देशमुख यांना प्राप्त झाल्याबरोबर त्यांनी तालुका समन्वयक किरण यशवंत पद्मगीरवार यांना माहिती पाठविली व सदर घटनेची चौकशी करण्यास सांगितले .

किरण पद्मगीरवार यांनी सरळ मंगरूळपीर पोलीस स्टेशन गाठले व एपीआय शुभांगी ताई थोरात यांच्याशी या विषयावर सविस्तर चर्चा केली .मुलीचे नाव व पत्त्यासह सगळे डिटेल्स असल्याने थोरात मॅडम आणि पोलीस कॉन्स्टेबल गजानन ब्राह्मण व किरण पद्मगीरवार हे पोलीसस्टेशनची गाडी घेऊन घटनास्थळी पोहोचले .संपूर्ण शहानिशा केल्यावर मुलगी ही अल्पवयीन असल्याचे आढळून आले .त्वरित वधू कडील सर्व मंडळीला पोलीस स्टेशनमध्ये बोलाविण्यात आले .त्या सर्वांचे समुपदेशन करताना हा विवाह कायद्याने मान्य नसल्याचे स्पष्ट केले मुलीच्या बहिणीला जावयाला बालविवाह प्रतिबंधक कायदा 2006 अंतर्गत माहिती देण्यात आली .अल्पवयात लग्न केल्याचे पुढे चालून मुलीवर होणारे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले .सर्वांनी समजून घेतले व सहकार्य करत लग्न थांबविले यापुढे असा प्रकार होणार नाही याबाबत त्या सर्वांकडून वचन पत्रही लिहून घेण्यात आले .

युवा रुरल असोसिएशन ही एक सामाजिक संस्था असून वाशिम जिल्ह्यामध्येपॉक्सो कायदा व बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी महत्त्वाची कामगिरी पार पाडत आहे .

ही कारवाई मंगरूळपीर पोलीस स्टेशनच्या महिला एपीआय शुभांगी थोरात, पोलीस कॉन्स्टेबल बि. एन. १४११ व युवा रुरल असोसिएशनच्या तालुका समन्वयक किरण यशवंत पद्मगिरीवार यांचा मुख्य सहभाग होता .




## खा.डॉ. नामदेव किरसान यांची अवकाळी पावसामुळे नुकसान ग्रस्त भागात भेट

नागभीड तालुक्यातील सतत पडणाऱ्या वादळी पावसामुळे व गारपीटमुळे शेतकऱ्यांच्या उन्हाळी धान पिकाला जोरदार फटका बसलेला आहे. आज गडचिरोली चिमुर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी अनेक शेतकऱ्यांच्या शेतात जावून पाहणी केली.

सागर हेटी,गंआकापूर,उश्रळमेंढा,वाढोणा,व तळोधी परिसरात अनेक शेतकरी उन्हाळी सिंचनाची सोय असल्याने धान पिकाचे लागवड करीत असतात. परंतु सतत दोन- तीन दिवस पडणाऱ्या वादळी वारा व गारपीटमुळे मुळे शेतकऱ्यांचे तोंडातील घास गेलेले आहे.



ऐन कापणी व मळणीला आलेला धानपिकाची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अनेक शेतकरी यांनी बँकेकडून कर्ज घेवून उन्हाळी धानाची लागवड केलेली होती..बँकेचे कर्जे कसे फेडायचे या चिंतेत शेतकरी आहे.

अशातच गडचिरोली- चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी तळोधी परीसरात शेतकऱ्यांच्या शेतीत जावून पाहणी करून त्याचा पाठपुरावा शासनाकडे करणार व नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रयत्न करणार अशी ग्वाही दिली.

यावेळी तालुका काँगेस कमेटीचे अध्यक्ष प्रमोदजी चौधरी, काँग्रेस नेते विनोदजी बोरकर, माजी जि.प.सद्स्य खोजरामजी मरस्कोल्हे,वाढोणा सरपंच देवेंद्रजी गेडाम,दिलीप पाटील गायकवाड,टिकेश्वर मस्के कैलास अमृतकर लुकेश निमगडे ,विलासजी भाकरे,प्रदीपजी येसनसुरे, अनिलजी डोर्लीकर,राजू देवानंद डोरलीकर रवी लोंढे बन्सोड,कैलास अम्रुतकर, साईनाथ डोंगरवार,लुकेश निमगडे,बळीराम गायकवाड,सौरभ नैताम, जगदिश ठवरे,क्रूषी अधिकारी,ग्रामसेवक,तलाठी, सरपंच, व गारपीट ग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

# खाजगी बस चा कर्नाळा खिंडीत भीषण अपघात



अविनाश जाधव वार्ताहर

कळंबोली वार्ताहरः-मुंबईवरून निघालेल्या खासगी बसला मुंबई गोवा हायवेवर भीषण अपघात झाला. या अपघातात दोघा प्रवाशांना प्राण गमवावे लागले, तर 32 हून अधिक प्रवासी जखमी आहेत. रायगड जिल्ह्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर असणाऱ्या पनवेल तालुक्यातील कर्नाळा खिंड येथे रविवारी रात्री च्या सुमारास हा अपघात झाला. मुंबई उपनगरातील बोरिवली येथून ओमकार ट्रॅव्हल्सची खासगी बस क्रमांक एमएच 47, वाय 7487 ही पस्तीस प्रवासी घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे निघाली होती. मात्र चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस पलटी होऊन भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोन प्रवाशांचा मृत्यू झाला असून तीस पेक्षा अधिक जखमी आहेत. त्यांच्यावर पनवेल तालुक्यातील विविध रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिसांकडून प्राप्त झाली आहे.

कर्नाळा खिंड येथे खासगी बसचा अपघात झाल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पनवेल तालुका पोलिसांसहित अपघातस्थळी पनवेल महानगरपालिका व कळंबोली फायर यांचे रेस्क्यू टीम अम्बुलन्स व क्रेन घटनास्थळी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

कर्नाळा खिंडीतील अपघातामुळे कर्नाळा खिंड परिसरात मुंबई गोवा महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. खासगी बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी सुरक्षा रक्षकांकडून शर्थीचे प्रयत्न तातडीने सुरु करण्यात आले. बसमधील सर्व जखमींना कळंबोली येथील एमजीएम रुग्णालय आणि पनवेल येथील गांधी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. यापैकी 23 प्रवाशांवर एमजीएममध्ये तर दोघा प्रवाशांवर गांधी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

## लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र रज्य् या संघटनामध्ये पत्रकार सुनिल शेवराबाई ज्ञानदेव भोसले यांची दुसऱ्यांदा निवड झाली प्रदेश आध्यक्ष पद आणि सत्कार करण्यात आले ....

प्रतिनिधी पुणे स्नेहा उत्तम मडावी

आज पुणे सर्किट हाऊस येथे आयोजित कार्यक्रम घेण्यात आलेले लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य संघाच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणीत पुणे जिल्हातील सक्रिय पत्रकार संघ लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र संघ भटक्या विमुक्त जाती जमाती आदिवासी प्रदेश आध्यक्ष आदर्श पत्रकार सुनिल सुज्ञान ज्ञानदेव भोसले यांना दुसऱ्यांसदा संधी देण्यात आले महिला प्रदेश उपाध्यक्षा सौ. हलिमाताई शेख संजय बाबा सरोदे पत्रकार स्नेहा उत्तम मडावी यांची निवड उपस्थित मान्यवराच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी निवडीचे प्रमाणपत्र प्रदेशाध्यक्ष श्री प्रताप साळुंखे पाटील संस्थापक आध्यक्ष भागवत वैद्या साहेब पत्रकार सुनिल (सुज्ञान) ज्ञानदेव भोसले महिला आघाडी श्रद्धा कंडुडे जयश्री बस्ते नाशिक विभाग आध्यक्षा धर्मेंद्र कदम नंदा भंडारे बीड मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले या ठिकाणी झालेल्या बैठकीत संघटना पुढे कशी आणता येईल संघटनाचे कार्य व स्वरूप नक्की काय असणार लोकशाही पत्रकार संघातिल् सभासद यांना या व्यवसायचे स्वरूप तसेच या संघटने मार्फत महिलांना रोजगारनिर्मिती असे अनेक मुद्दे मांडण्यात आले.




## कल्याणमध्ये एम.बी.ए कॉलेज



कल्याण(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) कल्याण आणि आजुबाजूच्या तालुक्यातील तरुणांना भविष्यात सक्षम बनविण्यासाठी एमबीए अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अचिव्हर्स कॉलेजला एआयसीटीईची मान्यता मिळाली आहे. कल्याणमधील अचिव्हर्स कॉलेज ऑफ कॉमर्स अण्ड मॅनेजमेंटचे संस्थापक प्राचार्य डॉ.सीए महेष भिवंडीकर आणि उपप्राचार्या,एमबीए प्रोग्राम कोऑर्डिनेटर कु. सोफिया डिसुझा यांच्या नेतृत्वाखाली मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, मास्टर ऑफ बिझनेस अडमिनिस्ट्रेषन एमबीए अभ्यासक्रमाला अधिकृत मान्यता "ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेषन" कडून मिळालेली आहे. उच्च दर्जाचे उदयोग केंद्रीत आणि जागतिक स्तरावर व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यासाठी कॉलेज तयार झाले आहे. तसेच देवू केलेल्या नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमाबाबत अचिव्हर्स कॉलेजचे उद्दिष्ट कल्याण आणि आजूबाजूच्या तालुक्यामध्ये पदव्युत्तर व्यवसाय षिक्षणाचे स्वरुप बदलण्याचे असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना वेगवान व्यवसाय जगात नेतृत्व करण्यास, नाविन्यपुर्ण होण्यास आणि यषस्वी होण्यास सक्षम बनविणाऱ्या व्यावसायिक पदवी कार्यक्रमात प्रवेष मिळेल.एमबीए अभ्यासक्रमाची सुरुवात ही अचिव्हर्स कॉलेजची शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यपुर्णता आणि समावेषक प्रषिक्षणासाठीची वचनबध्दता प्रतिबिंबित करते. जेणेकरुन कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर आणि इतर सभोवतालच्या भागातील इच्छुक विद्यार्थ्यांना याचा फायदा घेता येईल.

# संडे गार्डन, एक अनोखा उपक्रम,

## मिरा भाईंदरमध्ये सांस्कृतिक आनंद आणि मनोरंजनांचा पुन्हा एकदा शुभारंभ

भिवंडी (सुनील झळके)मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से) यांच्या उपस्थितीत "संडे गार्डन" या अनोख्या उपक्रमाचा शुभारंभाचा कार्यक्रम नुकताच ज्ञानज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले उद्यान (आरक्षण क्रमांक २६९), कनाकिया , मिरा रोड (पूर्व) येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

सदर शुभारंगाप्रसंगी उपायुक्त (मुख्यालय) श्रीम.कल्पिता पिंपळे, उद्यान प्रमुख नागेश वीरकर, सहाय्यक आयुक्त प्रभाग ६ जितेंद्र कांबळे , इतर मनपा अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संडे गार्डन उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना तसेच नागरिकांना त्यांच्या कलागुणांना वाव देऊन एक सादरीकरण व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या मागचा प्रमुख हेतू आहे. या पहिल्याच सत्रात शहरातील आबालवृद्धांनी व स्थानिक कलाकारांनी नृत्य, गाणी, गायन मिमिक्री जादूचे प्रयोग अशा विविध कला सादर करत संध्याकाळ खऱ्या अर्थाने रंगतदार केली.

संध्याकाळच्या या अनोख्या उपक्रमा अंतर्गत अनेक कलाकारांनी आपली कला सादर केली परंतु 14 वर्षीय कार्यक्रमाला रंगत आणली ती जादूगर स्वरांग रणदिवे जादूगार आणि आपले अप्रतिम जादुई खेळाच्या सादरीकरणांमधून कार्यक्रमात रंगत आणली आणि उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

संडे गार्डन हा उपक्रम दर रविवारी आयोजित केला जाणार असून, नागरिकांच्या सहभागातूनच मिरा भाईंदरच्या सांस्कृतिक कलागुणांना अधिक चालना मिळणार आहे असा विश्वास मनपा प्रशासनाला आहे. यापुढे प्रत्येक रविवारी म्हणजेच ११मे ला सालासार हनुमान उद्यान भाईंदर (पश्चिम) १८ मे ला जेसल पार्क चौपाटी भाईंदर( पूर्व)आणि २५ मे २०२५ ला आरक्षण क्रमांक २४२ रामदेव पार्क येथे संडे गार्डनचे पुढचे सत्र असणार आहे .

विद्यार्थ्यांना आता मे महिन्यांतील उन्हाळी सुट्ट्या लागल्यामुळे दर रविवारी मिरा भाईंदर शहरातली अनेक उद्याने लहानापासून वयोवृद्ध नागरिकांपर्यंत भरलेली असतात, अशाच जर उपस्थित कलाकार आणि नागरिकांना असे व्यासपीठ मिळाले तर मनोरंजन तर होईलच पण त्यासोबत त्यांच्या कलागुणांना वाव ही मिळेल यासाठी खास संडे गार्डनचे आयोजन केले आहे.अशा भावना यावेळी आयुक्तांनी व्यक्त केल्या. मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी तसेच कलाकारांनी उस्फूर्तपणे सहभाग घेत, या पुढची सगळी सत्र अशीच यशस्वी करावी असे आवाहन मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी केले आहे.




## जे.सी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची १२वी परीक्षेत १००% निकालाची परंपरा कायम

नुकताच बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल लागला असून यामध्ये जिनवरसा चवरे कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम




राखली आहे. महाविद्यालयातून यश दिलीपराव खेडकर या विद्यार्थ्याने 90 % गुण प्राप्त करून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. तसेच मुलींमधून गौरी विनोद गंद्रे या विद्यार्थिनीने ८९.५०%, आदर्श रवींद्र देशमुख ८७.३३%, प्रसाद किशोर गुगळे ८६.६७% गुण प्राप्त केले आहे. तसेच १२ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, ३७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व १२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच विषयानुसार इंग्रजीमध्ये २४ , मराठी १९, गणित १२ ,भौतिकशास्त्र ९, रसायनशास्त्र १७ ,जीवशास्त्र ६, इलेक्ट्रॉनिक्स १० ,सिविलमध्ये १३ विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे कारंजा एज्युकेशन सोसायटी चे सचिव श्री अमलप्रभ चवरे, जे.सी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य भारत हरसुले , आर.जे चवरे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका चोपडे, पर्यवेक्षक प्रशांत गंधक तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

# नवीन पाच एस.टी. गाड्या जनतेच्या सेवेत – किरण जैन

मंगरूळपीर (प्रतिनिधी) – मंगरूळपीर आगाराच्या संयुक्त विद्यमाने जनतेच्या सोयीसाठी पाच नवीन एस.टी. गाड्या सेवेत दाखल करण्यात आल्या आहेत. या गाड्यांचा लोकार्पण सोहळा स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. या नवीन गाड्यांमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुलभ आणि वेळेत प्रवासाची सुविधा मिळणार आहे. यामुळे शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि वृद्ध नागरिक यांना विशेषतः दिलासा मिळणार असल्याचे स्थानिकांनी सांगितले. मंगरूळपीर आगार प्रशासनाने या उपक्रमाद्वारे जनतेशी असलेली सेवा-भावना पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. “जनतेची सेवा हीच आमची प्राथमिकता आहे,” असे आगार प्रमुखांनी सांगितले. गाड्यांचे मार्ग, वेळापत्रक व सुविधा लवकरच अधिकृतरित्या जाहीर करण्यात येणार आहेत.



## सुलेमानिया उर्दू जुनियर कॉलेज ऑफ सायन्स मानोरा या शाळेचा निकाल 98.25 टक्के लागला.



विदर्भ प्रतिनिधी सुधीर भाऊ ढगे माळी.

आज बारावीचा निकाल लागला असेल मानोरा तालुक्यातील सुलेमानिया उर्दू जुनियस कॉलेज ऑफ सायन्स मानोरा यांचा निकाल ९८. २५ टक्के लागला आहे या शाळेमध्ये प्रथम क्रमांक आलेली मुलगी मिसबा खालिद फारूकी हि शाळेतील प्रथम क्रमांक पास84/50% झाली असून तिचे कौतुक संपूर्ण शहरामध्ये होत आहे तसेच दुसऱ्या क्रमांकाची मुलगी मुंनजा अजीम खान 84/17% तसेच तिसऱ्या क्रमांकावर हा मुलगा सफीहोदिन फहिमोदिन यांना 83/00%गुन मीळाले तसेच 09 विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत व इतर 47 विद्यार्थी द्वितीय श्रेणी पास झाले व शाळेचे व्यवस्थापन तर्फे सर्व मुलांचे अभिनंदन करण्यात आले प्राचार्य नवीन खान यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व त्यांचे अभिनंदन केले